राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान
अंमलबजावणी - मार्गदर्शक सूचना
(एनआरएलएम सेमी इन्टेंसिव्ह व
नॉन- इन्टेंसिव्ह)

## महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः मजिअ २०१३/प्र .क्र. २३४/योजना ३

**मंत्रालय, मुंबई - ४००० ३२**

तारीख: **दिनांक ११ आक्टोबर, २०१३**

वाचा §

1) **शासन निर्णय क्रमांकः एनआरएलएम २०११/प्र.क्र.१९६/योजना ३, दिनांक १८ जुलै, २०११**
2) **शासन परिपत्रक क्रमांकः एनआरएलएम २०१२/प्र.क्र.२४८/योजना ३,दिनांक ७ नोव्हेंबर,२०१२**
3) **शासन निर्णय क्रमांकः मजिअ-२०१३/प्र. क्र. ३६/योजना-३, दिनांक २० मार्च, २०१३**

प्रस्तावना §

ग्रामीण दारिद्र्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी, केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात केली असून; या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना केली आहे. दारिद्र्याचे निर्मूलन करण्यासाठी ग्रामीण गरीबांना एकत्र आणून, त्यांच्या सक्षम संस्था उभारणे, सदर संस्थांमार्फत गरीबांना वित्तीय सेवा पुरवणे, गरीबांची व त्यांच्या संस्थांची क्षमता वृध्दी व कौशल्यवृध्दी करणे आणि शाश्वत उपजीविकेची साधने उपलब्ध करुन देऊन त्यांना दारिद्र्याच्या बाहेर येण्यासाठी मदत करणे, हे अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हे दारिद्र्य निर्मूलनासाठी कटिबध्द असून, विविध कार्यपध्दतींनी अभियानाची अंमलबजावणी करणार आहे. राज्यातील १० (NRLP) जिल्हयांमधील ३६ तालुक्यांमध्ये जागतिक बँकप्रणित अर्थसहाय्यातून राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाच्या माध्यमातून Intensive पध्दतीने काम करण्यात येत आहे. १० जिल्हयांतील उर्वरित तालुके व इतर २३ जिल्ह्यातील तालुके अशा एकूण ३१५ तालुक्यांमध्ये नॉन-इन्टेंसिव्ह पध्दतीने अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यात टप्प्या टप्प्याने पुढील ७ ते ८ वर्षात अभियानाचे सार्वत्रिकीकरण साधत सर्वत्र इंटेंसिव्ह (Intensive) पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

नॉन इंटेंसिव्ह अभियान सन २०१३-१४ पासून “सेमी इंटेंसिव्ह” आणि “नॉन इंटेंसिव्ह” या दोन कार्यपध्दतींने अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ३१५ नॉन इंटेंसिव्ह

तालुक्यांमधील निवडक गटातील (जिल्हा परिषद मतदार संघ) गणांत (पंचायत समिती मतदार संघ) अभियान सेमी इंटेंसिव्ह कार्यपध्दतीने तर त्या व्यतिरिक्त उर्वरित क्षेत्रात नॉन-इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीने अभियानाची अंमलबजावणी करण्यात यावी असे धोरण निश्चित करण्यात आले आहे. राज्यातील ३१५ नॉन इंटेंसिव्ह तालुक्यांमध्ये करार तत्त्वावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती दिलेल्या प्रत्येकी दोन तालुका समन्वयकांच्या मदतीने सेमी इंटेंसिव्ह अभियान अंमलबजावणी करण्याबाबत बाब शासनाच्या विचाराधीन होती.

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या पुनर्रचनेत इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीमध्ये भांडवली अनुदान बंद करुन त्याऐवजी Capital Investment Support Fund (CISF) देण्याचे ठरविले आहे. अभियानांतर्गत लक्ष्य गट (Target Group) निश्चिती लोकसहभागातून गरीबी निर्धारण (Participatory Identification of Poor- PIP) प्रक्रियेतून करण्याबाबत निश्चित करण्यात आलेले आहे. या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या गरीबांच्या लक्ष्य गटास (Target Group) ग्रामपंचायतीची मान्यता घेऊन ग्रामसभेची संमती मिळविणे आवश्यक आहे. या PIP संदर्भात सविस्तर सूचना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोननती अभियानामार्फत निर्गमीत करण्यात येतील. राज्यात समुदाय संसाधन व्यक्ती व सध्या कार्यरत असलेली अंमलबजावणी यंत्रणा यांच्या माध्यमातून हे काम करणे अपेक्षित आहे. व्याज अनुदान वितरणाच्या बदललेल्या निकषांसह सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी निर्धारित उद्दीष्टे साध्य करण्याच्या हेतूने मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन परिपत्रक§

नॉन इंटेंसिव्ह अभियान सन २०१३-१४ पासून सेमी इंटेंसिव्ह आणि नॉन इंटेंसिव्ह या दोन कार्यपध्दतींनी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ३१५ नॉन इंटेंसिव्ह तालुक्यांमधील निवडक गटातील (जिल्हा परिषद मतदार संघ) गणांत (पंचायत समिती मतदार संघ) अभियान सेमी इंटेंसिव्ह कार्यपध्दतीने तर त्या व्यतिरिक्त उर्वरित क्षेत्रात नॉन-इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीने अभियानाची अंमलबजावणी करण्यात यावी. राज्यातील ३१५ नॉन इंटेंसिव्ह तालुक्यांमध्ये करार तत्त्वावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती दिलेल्या प्रत्येकी दोन तालुका समन्वयकांच्या मदतीने सेमी इंटेंसिव्ह अभियान अंमलबजावणी करण्यात यावी.

या गणांव्यतिरिक्त उर्वरित कार्यक्षेत्रात विस्तार अधिकारी (समुदाय संघटन व क्षमता बांधणी आणि Livelihoods & Bank Linkage) यांच्या मार्फत सध्या अस्तित्वात असलेल्या यंत्रणेच्या मदतीने नॉन-इन्टेंसिव्ह पध्दतीने अभियान अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच जिल्हास्तरावर प्रत्येकी एका आर्थिक समावेशन सल्लागाराची करार तत्त्वावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात यावी. (आर्थिक समावेशन सल्लागाराची करार तत्त्वावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्यामार्फत स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना वेगळयाने देण्यात येत आहेत.) अभियानाची अंमलबजावणी करताना समन्वय, सनियंत्रण आणि मूल्यमापनाचे महत्त्व लक्षात घेऊन प्रत्येक विभागस्तरावर विभागीय समन्वयक, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व निम्न

व्यावसायिक अशा पदांचा समावेश असलेला विभागीय कक्ष महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत स्थापन करण्यात यावा. या विभागीय कक्षातील नियुक्त्या मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत करण्यात येतील.

**राज्य शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जिवनोन्नती अभियानाची** (Non-Intensive NRLM) **अंमलबजावणी करण्याकरीता दिनांक ७ नोव्हेंबर, २०१२ च्या शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सुचना विहीत केल्या आहेंत. सदर शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सुचना अधिक्रमीत करुन सुधारीत मार्गदर्शक सुचना खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.**

केंद्र शासनाने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी रु. १७१५४.६७ कोटी एवढ्या मंजूर वार्षिक कृती आराखड्याच्या अनुषंगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सन- २०१३-१४ या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे आर्थिक निकष देण्यात आले आहेत:

**अ) अनुदानाच्या बाबी व मर्यादा :**

| अ. क्र. | अनुदानाच्या बाबी | किमान मर्यादा | कमाल मर्यादा | ठळक बाबी |
|---|---|---|---|---|
| १ | फिरता निधी | रू. १०,००० | रू. १५,००० | स्वयंसहाय्यता गटांना प्रथम श्रेणीकरणा -नंतर प्राप्त गुणांनुसार अनुज्ञेय. |
| २ | व्याज अनुदान | नाही | रु. ३ लक्ष पर्यंत कर्ज रकमेवर | केंद्र शासनाकडून स्वयंसहाय्यता गटांना बँक व्याजदर व ७% व्याजदर यामधील तफावतीएवढे व्याज अनुदान अनुज्ञेय. |
| ३ | समूह बांधणी निधी (एकवेळ) | ----- | रू. १०,००० | SHG क्षमता बांधणी व बँक जोडणी निधी |
| ४ | क्षमता बांधणी निधी / व्यक्ती | ----- | रू. ७,५०० | प्रती व्यक्ती / प्रती वर्ष |
| ५ | भांडवली अनुदान | सेमी इन्टेंसिव्ह व नॉन इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीमध्ये बंद करण्यात आले आहे. | | |

**ब) सेमी इन्टेंसिव्ह (Semi-Intensive) कार्यपध्दतीची अंमलबजावणी :**

I) सेमी इन्टेंसिव्ह गटांची/गणांची निवड करणे : नॉन-इन्टेंसिव्ह ३१५ तालुक्यांमधील अनुसूचित जाती/जमाती तसेच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची टक्केवारी यांना प्रत्येकी ५०% भारांश देऊन ज्या जिल्हा परिषद मतदार संघाची (गटाची) टक्केवारी सर्वाधिक होईल त्या जिल्हा परिषद संघाची (गटाची) निवड सेमी इन्टेंसिव्ह कार्यपध्दती अंतर्गत करण्यात यावी. या जिल्हा परिषद मतदार संघातील दोन्ही गणांमध्ये तालुका समन्वयकांच्या मदतीने अभियानाची अंमलबजावणी करण्यात यावी.

II) सेमी इन्टेसिंव्ह कार्यपध्दतीसाठी ग्रामपंचायतींची निवड करणे : उपरोक्त मुद्दा क्र. १ (I) मधील नमुद केलेले निकष व कार्यपध्दतीनुसार त्या गणातील सर्व ग्रामपंचायतींचा उतरता क्रम लावण्यात यावा. यामधील सर्वाधिक टक्केवारी असलेल्या ग्रामपंचायत क्षेत्रात सेमी इन्टेंन्स्व्हि पधदतीने अभियानाची अंमलबजावणी करण्यात यावी.

या गणामधील ग्रामपंचायतीं व्यतिरिक्त उर्वरित सर्व ग्रामपंचायतींमध्ये अभियानाची अंमलबजावणी नॉन-इन्टेंसिव्ह पध्दतीने करण्यात यावी.

२) सेमी इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीने अभियान अंमलबजावणीची जबाबदारी : तालुक्यामध्ये अभियानांतर्गत नियुक्त केलेल्या तालुका समन्वयकांच्या मदतीने निवडलेल्या गणातील ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात सेमी इन्टेंसिव्ह पध्दतीने अभियान अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित गटविकास अधिकारी यांच्यावर राहील. गटविकास अधिकारी यांनी प्रत्येकी एका गणाची जबाबदारी तालुका समन्वयकाकडे द्यावी. तालूका समन्वयक यांचे मानधन व अनुज्ञेय भत्ते यावरील खर्च अभियानांतर्गत क्षमता बांधंणी व प्रशिक्षण या शिर्षाखाली BMMU Cost मधील तरतूदीमधून भागवण्यात यावा.

**तालुका समन्वयकाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

१. अनियमित/बंद समुहांचे पुनरुज्जीवन करणे.

२. स्वंयसहाय्यता समुहांचे दशसुत्रीच्या आधारे श्रेणीकरण करणे.

३. गरीबांच्या संस्थांची उभारणी व संस्था बांधणी करणे.

४. गरीबांच्या संस्थांचे वर्गीकरण व बळकटीकरण करणे.

५. स्वंयसहाय्यता समुहांची क्षमता बांधणी व बँकजोडणी- करणे

६. संभाव्य समुदाय संसाधन व्यक्ती (Community Resource Person) ओळखणे.

७. हिशोबनीस (Book-Keeper) ओळखणे.

८. संभाव्य समुह साधन व्यक्तीच्या (CRP) कामाचे मुल्यमापन करणे.

**३) सेमी इन्टेंसिव्ह (Semi-Intensive) कार्यपध्दती :**

I) गावप्रवेश : गटविकास अधिकारी यांनी निवडलेल्या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेचे आयोजन करण्याविषयी निर्देश द्यावेत. अशा ग्रामसभेस पंचायतराज संस्थांचे पदाधिकारी, तालुकास्तरीय अधिकारी व तालुका समन्वयक यांनी उपस्थित राहून, उपस्थित ग्रामस्थांना-अभियानाचा उद्देश, अभियानांतर्गत कामाचे स्वरुप व तालुका समन्वयक यांचा परिचय करुन द्यावा. प्रारंभी काही काळ संबंधित विस्तार अधिकारी तालुका समन्वयकांस सहकार्य करुन त्यांच्या कामात मदत करतील. याप्रमाणे गणातील ग्रामपंचायती टप्याटप्याने हाती घेण्यात याव्यात.

II) गरीबांच्या संस्थांच्या माहितीचे संकलन : तालुका समन्वयक ग्रामपंचायत, गावपातळीवरील शासकीय यंत्रणा यांच्या मदतीने गावातील महिलांच्या एकूण स्वयंसहाय्यता समुहांची माहिती संकलित करावी. त्यापैकी नियमित सुरु असलेले समुह, अनियमित समुह व बंद पडलेले समुह माहिती करुन घेऊन कामास सुरुवात करावी. तसेच गावातील गरीबातील गरीब (Poorest of the Poor) कुटुंबांचा शोध

घेऊन त्या कुटुंबामधील किमान एका महिलेस स्वयंसहाय्यता समुहामध्ये समाविष्ट करुन घ्यावे. तसेच समुदायामधून योग्य गुणवत्तेच्या मनुष्यबळाची निवड व गटांची क्षमता बांधणी व बँक जोडणी ही कामे टप्प्याटप्याने हाती घ्यावीत.

III) गरीबांच्या संस्थांचे वर्गीकरण : तालुका समन्वयक यांनी प्रथम संबंधित कार्यक्षेत्रातील सध्याच्या गटांचे नियमित, बंद व अनियमित गट या प्रकारे वर्गीकरण करुन त्याप्रमाणे गटांच्या याद्या तयार कराव्यात.

i) नियमित गट : वर्गीकरणानंतर कार्यक्षेत्रातील ज्या स्वयंसहाय्यता समूहामध्ये सर्वसाधारणपणे बैठका, बचत, अंतर्गत /बँक कर्जव्यवहार, परतफेड व अभिलेखे ठेवणे यापैकी कोणत्याही ३ किंवा त्यापेक्षा जास्त बाबींचे पालन केले जात असल्यास त्या गटांचा समावेश नियमित गटामध्ये करावा.

ii) बंद गट : वर्षभरामध्ये एकही बैठक, बचत अथवा अंतर्गत व बँक कर्ज वाटपाचे व्यवहार झाले नसल्यास अशा गटांना बंद गटामध्ये समाविष्ट करावे.

iii) अनियमित गट : नियमित व बंद समूह वगळून उर्वरित सर्व समुहांचा समावेश अनियमित गटामध्ये करावा.

iv) गरीबांचे स्वयंसहायता गट, संस्थांची उभारणी व संस्थांची बांधणी :- तालुका समन्वयकांनी गावाच्या कार्यक्षेत्रातील गरीबांतील गरीब कुटुंबे ओळखून त्यांच्या कुटुंबातील महिलांचे नवीन स्वयंसहाय्यता गट तयार करावेत. असे गट तयार करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

i. स्वयंसहाय्यता समुहामध्ये सर्वसाधारणपणे किमान १० ते कमाल २० महिलांचा समावेश असावा. तथापि अपंग, वयोवृध्द, वेश्या व्यवसायी महिला, मानवी मैला वाहतूक करणाऱ्या व्यक्ती व तृतीय पंथी यांसारख्या विशेष प्रवर्गांच्या बाबतीत ही संख्या ५ पर्यंत शिथिलक्षम राहील.

ii. नवीन स्वयंसहाय्यता गट तयार करताना शक्यतो अस्तित्वात असलेल्या समूहांची मोडतोड करु नये. तथापि, अनियमित व बंद पडलेल्या स्वयंसहाय्यता गटांची पुनर्बांधणी शक्य नसल्यास स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन गटाच्या संमतीने गट पुनर्बांधणीसाठी तालुका समन्वयक यांनी योग्य तो निर्णय घ्यावा.

iii. अस्तित्वात असलेल्या गटांमधून एखाद्या सदस्यांस नवीन अथवा अन्य गटामध्ये सहभागी व्हावयाचे असल्यास त्यास मुळ समुहाचे संपूर्ण आर्थिक देणे व अन्य बाबी पूर्ण करणे आवश्यक राहील.

iv. स्वयंसहाय्यता गटातील थकबाकीदार सदस्य कोणत्याही कारणाने गटामधून बाहेर पडले असल्यास व त्यांना पुन्हा त्याच अथवा नवीन समुहामध्ये सहभागी व्हावयाचे असल्यास थकबाकीची वैयक्तिक अथवा गटाची रक्कम गटाकडे अथवा बँकेकडे भरणे आवश्यक राहील.

V) अनियमित/बंद गटांचे पुनरुज्जीवन : अनियमित व बंद गटांच्या अनियमिततेची अथवा बंद होण्याची कारणे शोधून त्यावर आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात. त्यांना पुनरुज्जीवित

करुन ते दशसूत्रीचे पालन करतील यासाठी क्षमता बांधणी करण्यात यावी. दशसूत्रीचे पालन करणाऱ्या स्वयंसहाय्यता गटांच्या बँक जोडणीचा आराखडा तयार करुन त्यांना वित्तिय सहाय्य उपलब्ध करुन द्यावे.

VI) स्वयंसहाय्यता गटांचे प्रथम व व्दितीय श्रेणीकरण : तालुका समन्वयक, बँक प्रतिनिधी व समुदायातील प्रतिनिधी (स्वयंसहाय्यता गटाचा प्रतिनिधी/समुदाय संसाधन व्यक्ती/हिशोबनीस) यांची समिती कार्यक्षेत्रातील पात्र गटांचे प्रथम व व्दितीय श्रेणीकरण करील. श्रेणीकरणानंतर गटाला प्राप्त श्रेणीनुसार फिरता निधी अथवा बँक अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात यावे. (प्रथम व द्वितीय श्रेणीकरणासाठी स्वतंत्र नमूना सोबत परिशिष्ट क्र. १ (अ/ब) मध्ये पहावा.)

VII) नियमित समुहांची क्षमता बांधणी व बँक-जोडणी : वर्गीकरणानंतर नियमित समुहांची क्षमता बांधणी व बँक-जोडणी करण्यासाठी खालीलप्रमाणे नियोजन व त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी.

i) नियमित स्वयंसहाय्यता गट दशसूत्रीचे पालन करीत आहेत याबाबत भेटीव्दारे खातरजमा करण्यात यावी.

ii) दशसूत्रीचे पालन करणाऱ्या स्वयंसहाय्यता गटांच्या क्षमता बांधणीचा आराखडा तयार करुन त्यांना त्याप्रमाणे प्रशिक्षणाची कार्यवाही करावी.

iii) दशसूत्रीचे पालन करणाऱ्या स्वयंसहाय्यता गटांच्या बँक जोडणीचा आराखडा तयार करुन त्यांना वित्तिय सहाय्य उपलब्ध करुन द्यावे.

VIII) समुदाय साधन व्यक्ती (Community Resource Person) ओळखणे : तालुका समन्वयक गावातील समुहांची माहिती घेताना समुहातील संभाव्य समुदाय साधन व्यक्ती (Community Resource Person) बनण्याची क्षमता असलेल्या महिलांचा शोध घेतील.

IX) हिशोबनीस (Book-Keeper) ओळखणे : तालुका समन्वयक गावातील समुहांची माहिती घेताना समुहातील हिशोबनीस (Book-Keeper) बनण्याची क्षमता असलेल्या महिलांचा शोध घेतील.

I) ४) समुह साधन व्यक्ती (CRP) व हिशोबनीस यांची निवड : मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी तालुका समन्वयकांनी ओळखून सादर केलेल्या माहितीच्या आधारे, समुह साधन व्यक्ती (CRP) व हिशोबनीस बनण्याची क्षमता असलेल्या व्यक्तींची निवड करतील. समुह साधन व्यक्ती (CRP) व हिशोबनीसाची निवड करण्यासाठी गटचर्चा/वैयक्तिक मुलाखत/लेखी चाचणी यासारख्या कार्यपध्दतीचा आवश्यकतेप्रमाणे अवलंब करावा. निवड झालेल्या महिलांना ६ महिन्यापर्यंत स्वत:च्या गटात व गावातील गटात निम्न मुद्दा क्र.४ (II) प्रमाणे कर्तव्य पार पाडल्यानंतर त्यांच्या कामकाजाचे गट विकास अधिकाऱ्यांनी तालुका समन्वयकांमार्पत मुल्यांकन करुन मुल्यांकन अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या अहवालाच्या आधारे उत्कृष्ट काम केलेल्या महिलांना समुह साधन व्यक्ती (CRP) व हिशोबनीस (Book Keeper) म्हणुन मान्यता द्यावी. त्यांच्या अनुभवाचा अन्य गट बळकटीकरण करण्यासाठी उपयोग करुन घ्यावा.त्यांना या सेवेच्या

मोबदल्यात ४ (III) प्रमाणे सेवाशुल्क व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील. यासाठी येणारा खर्च क्षमता बांधणी व प्रशिक्षण या शिर्षांतर्गत BMMU Cost मधून करण्यात यावा.

**II) संभाव्य समुह साधन व्यक्ती (CRP) निवडण्यासाठी सर्वसाधारण निकष –**

१. सदस्य महिला किमान ७ वी उत्तीर्ण असावी.

२. तिचा गट किमान २ वर्षे अनुभवी असावा.

३. गटाच्या किमान २२ सभांमध्ये ती सहभागी असावी.

४. तिची वैयक्तिक बचत किमान १,०००/- रूपये असावी.

५. तिने गटातून किमान २ किंवा त्यापेक्षा जास्त वेळा कर्ज घेऊन नियमित परतफेड केलेली असावी.

६. ती उत्तम सुसंवादी व स्वेच्छेने इतरांना शिकविणारी असावी.

III) संभाव्य समुह साधन व्यक्ती (CRP) च्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या : कामाच्या ६ महिने अनुभवानंतर त्यांच्या कामाचे तालुका समन्वयकामार्फत मुल्यमापन करण्यात येईल. त्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत.

१. CRP महिला त्यांच्या गटात व गावातील इतर गटांना मार्गदर्शन करणे.

२. समुहाला दशसूत्रीचे महत्त्व पटवून देऊन दशसूत्रीचे पालन करण्यासाठी सक्षम बनविणे.

३. गरीब कुटुंबातील महिलांना संघटित करुन त्यांचे स्वयंसहाय्यता गट स्थापन करणे.

४. महिलांची प्रशिक्षणाव्दारे क्षमता बांधणी करणे व बँक जोडणीकरीता सहाय्य करणे.

५. समुहाचे मासिक अहवाल तयार करण्यासाठी मदत व मार्गदर्शन करणे.

IV) संभाव्य समुह साधन व्यक्ती (CRP) चे सेवाशुल्क : CRP महिलेला पहिल्या ६ महिन्यांमध्ये स्वत:च्या गटात व गावांतर्गत गटात केलेल्या कामासाठी कोणत्याही प्रकारचे मानधन अनुज्ञेय नाही. त्यानंतर इतर गावे व अन्य ग्रामपंचायत क्षेत्रात केलेल्या कामासाठी प्रतीदिन रु. २००/- प्रमाणे सेवाशुल्क दरमहा कमाल १५ दिवसांसाठी अनुज्ञेय राहील. त्यांनी प्रत्यक्ष केलेला प्रवासखर्च किंवा रु.५०/- प्रतीदिन यापैकी जे कमी असेल तेवढा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील. CRP चे सेवाशुल्क व प्रवासभत्ता यावरील खर्च अभियांनांतर्गत क्षमता बांधंणी व प्रशिक्षण या शिर्षाखाली BMMU Cost मधील तरतूदीमधून भागवण्यात यावा.

**V) हिशोबनीस (Book-Keeper) व्यक्तीचे निवडण्यासाठी सर्वसाधारण निकष –**

१. किमान १० वी उत्तीर्ण असावी व लेखे ठेवण्यास सक्षम असावी.

२. तिचा गट किमान १ वर्ष अनुभवी असावा.

३. गटाच्या किमान १० सभांमध्ये ती सहभागी असावी.
४. तिची वैयक्तिक बचत किमान ५००/- रूपये असावी.
५. तिने गटातून किमान २ किंवा त्यापेक्षा जास्त वेळा कर्ज घेऊन त्याची परतफेड नियमित केलेली असावी.
६. ती उत्तम सुसंवादी व स्वेच्छेने इतरांना शिकविणारी असावी.

**VI) हिशोबनीस (Book-Keeper) च्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

१. गटाचे लेखे अद्ययावत ठेवील.

२. गटाला आर्थिकदृष्ट्या साक्षर करणे.

३. गटाच्या सदस्यांना त्यांच्या समुहातील आर्थिक स्थितीबाबत मार्गदर्शन करणे.

४. गटाचा दरमहाचा अहवाल तयार करुन सादर करणे.

VII) हिशोबनीसाचे सेवाशुल्क : हिशोबनीस व्यक्ती शक्यतो गटांतर्गत असल्याने तिला कोणत्याही प्रकारचे मानधन अनुज्ञेय ठरत नाही. हिशोबनीस गटाकडे उपलब्ध नसल्यास बाह्यनियुक्त हिशोबनीसाला स्वनिधीमधून मानधन देण्याविषयी निर्णय गटाने घेण्यास हरकत नाही. त्यासाठी शासकीय अनुदान देण्यात येणार नाही. परगावांमध्ये लेखाविषयक माहिती देण्यासाठी निवडण्यात येणाऱ्या हिशोबनीस महिलांना समुह साधन व्यक्ती (CRP) प्रमाणे सेवाशुल्क व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

४) दशसूत्री : स्वयंसहाय्यता गटांना दशसूत्रीचे पालन करण्यासाठी प्रशिक्षण देणे व त्यांची क्षमता बांधणी करणे आवश्यक आहे. दशसूत्रीमधील पहिली ५ सूत्रे स्वयंसहाय्यता गटाची आर्थिक क्षमता वृध्दीसाठी उपयुक्त आहेत, तर उर्वरित ५ सूत्रे गटाचा सामाजिक विकास करण्यासाठी अंतर्भूत करण्यात आलेली आहेत. प्रत्येक स्वयंसहाय्यता गटांने दशसूत्रीचे पालन केल्यास गटातील प्रत्येक सदस्याचा आर्थिक व सामाजिक विकास होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यात मदत होणार आहे. (दशसूत्री परिशिष्ट क्र. १ क मध्ये पहावी.)

५) गटाच्या सभेसाठी विषयपत्रिका (सर्वसाधारण) : गटाच्या सभेसाठी विषयपत्रिकेवर सर्वसाधारणपणे, सदस्यांची हजेरी, जमाबचत, कर्ज परतफेड (अंतर्गत व बँक कर्ज), कर्ज मागणी, शौचालयाचा नियमित वापर, कुटुंब कुपोषण मुक्त होण्यासाठी उपाययोजना, महिलांच्या आरोगयाच्य उपाययोजना, कुटुंबातील मुला-मुलींच्या नियमित शिक्षणासाठी, आहार व आरोग्यासाठी अर्थसहाय्य, पंचायतराज संस्थांबरोबर समन्वय व शासकीय योजनांमध्ये सक्रीय सहभाग कुटुंबाचे जीवनमान उंचाविण्यासाठी गटाने करावयाच्या कायमस्वरुपी उपाययोजना व ऐनवेळेचे विषय इत्यादी विषयांचा समावेश करुन त्याप्रमाणे कार्यवृत्तांत/इतिवृत्त लिहण्यासाठी मार्गदर्शन करावे.

**<u>क) नॉन-इन्टेंसिव्ह (Non-Intensive) कार्यपध्दती :</u>**

१) नॉन-इन्टेंसिव्ह (Non-Intensive) कार्यपध्दतीचे कार्यक्षेत्र : नॉन-इन्टेंसिव्ह **३१५** तालुक्यांमधील सेमी इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीचे कार्यक्षेत्र वगळता उर्वरित संपूर्ण कार्यक्षेत्रामध्ये नॉन-इन्टेंसिव्ह पध्दतीने अभियान अंमलबजावणी करण्यात यावी.

२) **नॉन-इन्टेंसिव्ह (Non-Intensive) कार्यपध्दती अंमलबजावणीची जबाबदारी :**

i) विस्तार अधिकारी (समुदाय संघटन व क्षमता बांधणी, Livelihoods & Bank Linkage) यांना नॉन-इन्टेसिंव्ह पध्दतीने अभियान अंमलबजावणीची जबाबदारी समप्रमाणात देण्यात यावी.

ii) विस्तार अधिकारी (समुदाय संघटन व क्षमता बांधणी, Livelihoods & Bank Linkage) या पदाचे वेतन व भत्ते, प्रवास भत्ता, रजावेतन, निवृत्ती वेतन अंशदान इ. बाबींवरील खर्च पुढील शासन निर्देश येईपर्यंत अभियानांतर्गत क्षमता बांधणी व प्रशिक्षण या शीर्षाखाली BMMU Cost मधील तरतुदींमधून भागविण्यात यावा.

iii) संबंधित विस्तार अधिकारी यांनी जबाबदारी सोपविलेल्या सर्व ग्रामपंचायत क्षेत्रात सध्याच्या कार्यरत व्यवस्थेच्या (NGOs, प्रेरक, प्रेरिका, संघटिका, सहयोगिनी इ.) मदतीने कार्यवाही करावी.

iv) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात नॉन-इंटेंसिव्ह कार्यपध्दती क्षेत्रात कोणतेही नवीन स्वयंसहाय्यता समूह अथवा त्यांचे संघ स्थापन करण्यात येऊ नयेत.

v) गट विकास अधिकारी यांनी विस्तार अधिकारी (समुदाय संघटन व क्षमता बांधणी, Livelihoods & Bank Linkage) यांच्यामार्फत नॉन-इन्टेंसिव्ह कार्यक्षेत्रात नॉन-इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीनुसार अभियान अंमलबजावणी करावी.

vi) कार्यक्षेत्रातील स्वंयसहाय्यता गटांचे वर्गीकरण, क्षमता बांधणी, बँक-जोडणी, अनियमित/बंद गटांचे पुनरुज्जीवन व प्रथम व व्दितीय श्रेणीकरण सेमी-इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीप्रमाणे करण्यात यावे.

ड) सेमी /नॉन-इन्टेंसिव्ह कार्यपध्दती अंतर्गत क्षमता बांधणी व प्रशिक्षण - अभियानांतर्गत अंमलबजावणी यंत्रणेची व समुदायाची क्षमता बांधणी करण्यासाठी नियोजन आराखडा तयार करण्यात यावा. यंत्रणेंतर्गत अधिकाऱ्यांना क्षमता बांधणी, व्यवसाय आणि कौशल्य विषयक प्रशिक्षण देण्यात यावे.प्रशिक्षण विषयक हस्तपुस्तिका आणि अनुषंगिक साहित्य राज्य अभियान कक्षाकडून पुरविण्यात येईल. तसेच प्रशिक्षणासंदर्भात अनुषंगिक सूचना वेळोवेळी वेगळयाने निर्गमीत करण्यात येतील. राज्यस्तरावर भारत निर्माण अभियानांतर्गत प्रशिक्षित होणाऱ्या स्वयंसेवकांनासुध्दा राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे प्रशिक्षण देण्यासाठी संबंधित विभागाकडे समन्वय साधावा.

१) अंमलबजावणी यंत्रणेची क्षमता बांधणी : गाव, तालुका, जिल्हास्तरावरील अंमलबजावणी यंत्रणेची गरजेनुसार व मागणीनुसार प्रशिक्षणाव्दारे तसेच प्रत्यक्ष क्षेत्रभेटीव्दारे राज्यातील व राज्याबाहेर क्षमता बांधणी करण्यात यावी.

I) अधिकाऱ्यांची क्षमता बांधणी : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व त्यांच्या अधिनस्त विभाग प्रमुख/ खाते प्रमुख आणि तालुका समन्वयक यांची अभियानाच्या गरजेनुसार

प्रशिक्षणाव्दारे तसेच प्रत्यक्ष क्षेत्रभेटीव्दारे क्षमता बांधणी करण्यात यावी. विभागस्तरावरील यंत्रणेची क्षमता बांधणी राज्यस्तरावरून करण्यात येईल.

II) बँक अधिकाऱ्यांची क्षमता बांधणी : जिल्हा व तालुका स्तरावरील सर्व बँकांच्या संबंधित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण व क्षेत्रभेटीव्दारे अभियानाची भूमिका व बँकांची भूमिका याबाबत कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे.

III) सध्या अस्तित्वात असलेल्या प्रेरक/प्रेरिका, सहयोगिनी, संघटीका आणि अशासकीय संस्था तसेच गटबांधणी व गटांचे बळकटीकरण करणाऱ्या सर्व संबंधित व्यक्तींची प्रशिक्षणाव्दारे क्षमता बांधणी करण्यात यावी.

IV) पंचायतराज संस्थांच्या सदस्यांची क्षमता बांधणी : गाव, तालुका व जिल्हास्तरावरील निवडक सदस्यांना प्रशिक्षण देऊन तसेच क्षेत्रभेटीव्दारे अभियानाची भूमिका व पंचायतराज संस्थांची भूमिका याबाबत माहिती देण्यात यावी. केंद्र शासनाच्या विविध प्रशिक्षण योजना (उदा. BRGF) मध्ये सुध्दा या अभियानाच्या प्रशिक्षणाचा विषय समाविष्ट करण्यात यावा.

**२) समुदायाची क्षमता बांधणी :**

I) समुदाय संसाधन व्यक्तींची (CRP) क्षमता बांधणी : तालुका समन्वयकांनी निवडलेल्या समुदाय संसाधन व्यक्तींची प्रशिक्षण व क्षेत्रभेटीव्दारे क्षमता बांधणी करण्यात यावी.

II) हिशोबनीसची (Book-Keeper) क्षमता बांधणी : हिशोबनीसांना स्वयंसहाय्यता गटाचे अभिलेखे अद्ययावत ठेवण्यासाठी व समुहांना वित्तविषयक सल्ला देण्यासाठी हिशोबनीसांची प्रशिक्षण व क्षेत्रभेटीव्दारे क्षमता बांधणी करण्यात यावी.

III) स्वयंसहाय्यता समुहाच्या सदस्यांची क्षमता बांधणी : स्वयंसहाय्यता समुहाच्या सदस्यांना दशसूत्रीचे पालन, पायाभूत व कौशल्यविषयक प्रशिक्षणाव्दारे स्वतःच्या कुटुंबाचे जीवनमान उंचाविण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी प्रशिक्षण देण्यात यावे. (राज्य अभियान कक्षाकडून याबाबतचे नियोजन व मार्गदर्शक सूचनांनुसार उचित नियोजन करुन कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे.)

**इ) सेमी /नॉन-इन्टेंसिव्ह कार्यपध्दती अंतर्गत स्वयंसहाय्यता गटांना अर्थसहाय्य कार्यपध्दती :**
दशसूत्रीचे पालन करणाऱ्या व फिरता निधी न मिळालेल्या स्वयंसहाय्यता गटांना प्रथम फिरता निधी उपलब्ध करुन द्यावा.

१. फिरत्या निधीची तरतूद : साधारणत: दशसूत्रीचे पालन करणाऱ्या ३ ते ६ महिने कालावधी पुर्ण केलेल्या स्वयंसहाय्यता समूहांना प्रथम श्रेणीकरणानंतर प्राप्त गुणांच्या प्रमाणात रु. १० हजार ते रु. १५ हजार एवढा फिरता निधी देण्यात यावा. फिरत्या निधीची रक्कम बँकांमार्फत थेट स्वयंसहाय्यता गटाच्या बचत खात्यात वर्ग करण्यात यावी.

**२. फिरता निधी वितरण कार्यपध्दती :**

I) स्वयंसहाय्यता गटाच्या प्रथम श्रेणीकरणानंतर गट फिरत्या निधीसाठी पात्र ठरल्यास विस्तार अधिकारी/तालुका समन्वयक यांनी तात्काळ अशा गटाची माहिती गटविकास अधिकारी यांच्याकडे सोबतच्या परिशिष्ट क्र. ४ मध्ये सादर करावी.

II) फिरत्या निधीसाठी पात्र स्वयंसहाय्यता गटांसाठी फिरत्या निधीची मागणी सोबतच्या परिशिष्ट क्र. ४ मध्ये गटविकास अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे सादर करावी.

III) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाकडे, पंचायत समितीकडून प्राप्त झालेली फिरत्या निधीची मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित गटाच्या खाती RTGS व्दारे वर्ग करण्यासाठी संबंधित बँकेकडे सोबतच्या परिशिष्ट क्र. ५ मध्ये पाठवावी व त्याची एक प्रत पंचायत समितीला व एक प्रत पंचायत समितीमार्फत गटाकडे पाठविण्यात यावी.

IV) फिरत्या निधीची रक्कम बँकेस प्राप्त झाल्यापासून आठ दिवसाच्या आत संबंधित गटाच्या खाती वर्ग करण्यात यावी. याबाबत तालुका समन्वयक/ विस्तार अधिकारी/ गटविकास अधिकारी यांनी खातरजमा करुन घ्यावी.फिरता निधी वितरण केल्यानंतर स्वयंसहाय्यता गटांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य उपलब्ध करुन द्यावे. (RBI मार्गदर्शक सुचना दिनांक २७ जून, २०१३ नुसार)

**३. स्वयंसहाय्यता गटांना अर्थसहाय्य / पतपुरवठा-**

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना किंवा राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान या अंतर्गत ज्या स्वयंसहायता गटांना यापूर्वी खाली दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिकचे अर्थसहाय्य घेऊन त्याची परतफेड केलेली आहे. किंवा परतफेड सुरु आहे, अशा गटांना यापूर्वी घेतलेल्या कर्ज मर्यादेच्या पुढील टप्प्यातील

अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. तथापि त्या गटांनी यापूर्वी घेतलेले अर्थसहाय्य परतफेड केलेले नाही किंवा अनियमित परतफेड केलेली / करीत आहेत, त्यांना घेतलेले अर्थसहाय्य संपूर्ण परतफेडीनंतर त्यांच्या क्षमतेनुसार अर्थसहाय्य देण्यात यावे. अभियानांतर्गत नवीन गटांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात यावे.

I) पहिले अर्थसहाय्य/पतपुरवठा - व्दितीय श्रेणीकरणानंतर पात्र स्वयंसहाय्यता गटांना त्यांच्या एकूण बचतीच्या ४ ते ८ पट किंवा किमान रु. ५० हजार यापैकी जी रक्कम अधिक असेल तेवढे अर्थसहाय्य देण्यात यावे. प्रथम अर्थसहाय्य देण्यासाठी खालीलप्रमाणे सर्वसाधारण निकष देण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **गटास प्राप्त गुण** | **अनुज्ञेय अर्थसहाय्य** |
|---|---|---|
| १) | ८० ते १०० | नाबार्ड निकषानुसार पंचसुत्रीचे पालन करणाऱ्या गटांना त्यांच्या एकूण बचतीच्या ७ ते ८ पट, किंवा रु. ५० हजार यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम आणि दशसुत्रीमधील सामाजिक मुदयांच्या अनुपालनानंतर प्राप्त गुणांच्या आधारे अधिकचे रु. २५०००/- अनुज्ञेय. |
| २) | ६० ते ७९ | नाबार्ड निकषानुसार पंचसुत्रीचे पालन करणाऱ्या गटांना त्यांच्या एकूण बचतीच्या ५ ते ६ पट, किंवा रु. ५० हजार यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम आणि दशसुत्रीमधील सामाजिक मुदयांच्या अनुपालनानंतर प्राप्त गुणांच्या आधारे अधिकचे रु. २००००/- अनुज्ञेय. |
| ३) | ५० ते ५९ | नाबार्ड निकषानुसार पंचसुत्रीचे पालन करणाऱ्या गटांना त्यांच्या एकूण बचतीच्या ४ पट, किंवा रु. ५० हजार यापैकी जी रक्कम जास्त असेल ती रक्कम आणि दशसुत्रीमधील सामाजिक मुदयांच्या अनुपालनानंतर प्राप्त गुणांच्या आधारे अधिकचे रु. १५०००/- अनुज्ञेय. |

स्वयंसहाय्यता गटास पहिले अर्थसहाय्य/पतपुरवठा गटाची स्थापना झाल्यानंतर ६ महिन्यांमध्ये आणि फिरता निधी मिळाल्यानंतर साधारणत: ३ महिन्यांमध्ये देण्यात यावे. गट जुना असल्यास किमान ३ महिने दशसूत्रीचे पालन करणाऱ्या गटास फिरता निधी मिळालेला असल्यास पहिले अर्थसहाय्य/पतपुरवठा देण्यात यावे. हे अर्थसहाय्य ६ ते १२ महिन्यांच्या कालावधीत परतफेड करण्यात यावे.

II) दुसरे अर्थसहाय्य - पहिल्या अर्थसहाय्याची संपूर्ण परतफेड करणाऱ्या स्वयंसहाय्यता गटास एकूण बचतीच्या ५ ते १० पट, किंवा रु. १ लक्ष यापैकी जी रक्कम जास्त असेल तेवढे अर्थसहाय्य देण्यात यावे. हे अर्थसहाय्य १२ ते २४ महिन्यांच्या कालावधीत परतफेड करण्यात यावे.

III) तिसरे अर्थसहाय्य - स्वयंसहाय्यता गटाच्या प्रकल्प आराखड्याच्या (ॲक्टीव्हीटी) किंमतीनुसार किंवा किमान रु. २ ते ५ लक्ष रकमेएवढे, हे अर्थसहाय्य दशसूत्रीचे सर्वसाधारण पालन करणाऱ्या गटास दुसरे अर्थसहाय्य ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधीक रकमेची परतफेड केल्यानंतर देण्यात यावे. हे कर्ज २ ते ५ वर्षांच्या कालावधीत परतफेड करण्यात यावे.

IV) चौथे अर्थसहाय्य - स्वयंसहाय्यता गटाच्या प्रकल्प आराखड्याच्या (ॲक्टीव्हीटी) किंमतीनुसार किंवा किमान रु. ५ ते १० लक्ष रकमेएवढे, हे अर्थसहाय्य दशसूत्रीचे सर्वसाधारण पालन करणाऱ्या गटास तिसरे अर्थसहाय्य ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधीक रकमेची परतफेड केल्यानंतर देण्यात यावे. हे कर्ज ३ ते ६ वर्षांच्या कालावधीत परतफेड करण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे रु. १० लाखांच्या मर्यादेत अर्थसहाय्यासाठी कोणत्याही प्रकारचे बंधपत्र अथवा जामीन देण्याची आवश्यकता नाही. तसेच बचतीची रक्कम अथवा अनामत रक्कम बॅकेत ठेवण्याची आवश्यकता नाही. सेमी इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीमध्ये तालुका समन्वयक तर नॉन-इन्टेंसिव्ह कार्यपध्दतीमध्ये विस्तार अधिकारी यांनी गटांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यासाठी पाठपुरावा करावा.

४. सेमी /नॉन-इन्टेंसिव्ह कार्यपध्दती अंतर्गत बँक अर्थसहाय्य मेळावा : तालुका समन्वयक, विस्तार अधिकारी यांनी ग्रामसेवक, अशासकीय संस्थांचे सदस्य यांचे सहकार्य घेऊन आपापल्या कार्यक्षेत्रातील बँकांचा दरमहा ग्रामपंचायतनिहाय बँक अर्थसहाय्य मेळावा आयोजित करावा. अशा मेळाव्यास जिल्हास्तरीय प्रशासकीय अधिकारी/ बँक अधिकारी यांच्यासह तालुकास्तरीय प्रशासकीय अधिकारी/

बँक अधिकारी यांनी उपस्थित राहावे. बँक अर्थसहाय्य मेळाव्यात साधारणत: खालील बाबींना प्राधान्य देण्यात यावे.

i) स्वयंसहाय्यता गटांचे/सदस्यांचे बँकेत खाते उघडणे, त्यांना बँक सुविधांची माहिती देणे.

ii) सुक्ष्म अर्थसहाय्याचे महत्त्व समजावून देणे तसेच कर्ज प्रस्ताव तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

iii) स्वयंसहाय्यता गटांच्या कर्ज प्रकरणांना मंजुरी देणे.

iv) स्वयंसहाय्यता गटांना मंजुर कर्जाचे वितरण करावे.

v) कर्ज परतफेडीबाबत आढावा घेऊन मार्गदर्शन करावे.

स्वयंसहाय्यता गटांना बँकेकडे अर्थसहाय्य मागणीसाठी प्रस्तावासोबत द्यावयाचा नमुना सोबत परिशिष्ट क्र. ३ मध्ये जोडलेला आहे.

५. सेमी/नॉन-इन्टेंसिव्ह कार्यपध्दती अंतर्गत व्याज अनुदान : केंद्र शासनाने स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेमध्ये समाविष्ट असलेला भांडवली अनुदान या घटकांतर्गत तरतूद सन २०१३-१४ पासून बंद केलेली आहे. अभियानांतर्गत व्याज अनुदान सन २०१३-१४ वर्षापासून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमार्फत गरीबांच्या संस्थांना देण्यात येणार आहे.

**I) व्याज अनुदान तरतूद :**

i) केंद्र शासन व राज्य शासन अनुक्रमे ७५% व २५% रक्कम व्याज अनुदानासाठी उपलब्ध करुन देणार आहे. NRLM अंतर्गत किमान ७०% सदस्य दारिद्र्य रेषेखालील असलेल्या महिलांच्या गटांना व्याज अनुदान अनुज्ञेय व देय राहील.

ii) यापुर्वी घेतलेल्या कर्जावर भांडवली अनुदान मिळालेले असल्यास अशा कर्जाच्या शिल्लक रकमेच्या परतफेडीवर व्याज अनुदान देता येणार नाही. तथापि, संपूर्ण कर्जाची परतफेड झाल्यानंतर रु. ३ लक्षच्या मर्यादेत नव्याने घेतलेल्या कर्ज रकमेवर व्याज अनुदान अनुज्ञेय राहील.

iii) केंद्र शासन समुहांना बँकांमार्फत ७% व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देणार आहे. बँक व्याज दर व ७% व्याज दर यामधील तफावतीएवढी रक्कम केंद्र शासन व्याज अनुदान म्हणून बँकेमार्फत गटाच्या खात्यावर उपलब्ध करुन देणार आहे.

iv) स्वयंसहाय्यता गटांना वार्षिक रुपये ३ लक्षच्या मर्यादेत घेतलेल्या बँक कर्ज रकमेवर परतफेडीच्या प्रमाणात व्याज अनुदान देण्यात यावे.

## ई) स्वयंसहायता गटांचे संगणकीकरण (SHG Inventory) करणे :

जिल्हयातील ज्या दोन तालुक्यांमध्ये स्वयसहाय्यता गटांचे संगणकीकरण (SHG Inventory) करण्याचे काम करण्यात आलेले आहे, त्या तालुक्यांमधील उपलब्ध यंत्रणेच्या मार्गदर्शनाखाली उर्वरित सर्व तालुकयांमध्ये नोव्हेंबर २०१३ अखेर स्वयसहाय्यता गटांचे संगणकीकरण (SHG Inventory) पूर्ण करण्यात यावे.

## उ) क्लस्टर स्तरावर सुक्ष्म उद्योग निर्मिती :

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना/ समुहाला गरीबीतून वर आणण्यासाठी सामूहीक स्वरुपाचे व्यवसाय निर्माण केल्यास त्यांच्या उत्पादनासाठी लागणारी विपणन व्यवस्था आणि अनुषंगिक पाठबळ सहजतेने उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नात कायम स्वरुपी वाढ होऊ शकते, म्हणून केंद्र शासनाने स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेत सुध्दा ऍ़क्टीव्हीटी क्लस्टरची संकल्पना अंमलात आणण्यासाठी निर्देशित केलेले होते. तथापि, या संकल्पनेला म्हणावे तेवढे महत्व देण्यात आले नव्हते. नवीन धोरणामध्ये ऍ़क्टीव्हीटी क्लस्टरच्या संकल्पनेला अनन्य साधारण महत्व दिलेले आहे.

### नवीन धोरणातील महत्त्वाचे घटक खालीलप्रमाणे आहेत:-

i) प्रत्येक जिल्ह्याकरीता निवडक व्यवसाय आणि त्या व्यवसायाचे क्षेत्र (Activity Clusters) निश्चित करण्यात यावेत. शक्यतो प्रत्येक तालुक्यात एक किंवा दोन क्लस्टर निवडून त्यामध्ये योग्य उद्योग व्यवसायासाठी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करावा. व्यवसायाचे क्षेत्र (Activity Cluster) नोंदणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा स्तरावर करण्यात यावी.

ii) सर्वसाधारणत: प्रत्येक क्लस्टरमध्ये सर्वसाधारणपणे २०० स्वरोजगारी सहभागी होऊ शकतील अशा पध्दतीने नियोजन करावे. Activity Clusters निहाय प्रत्येक प्रकल्पाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा.

iii) प्रकल्प अहवाल तयार करताना त्यामध्ये सारांशाने प्रास्ताविक, लक्ष्य गट, SWOT विश्लेषण, उद्दीष्ट गट (ज्यामध्ये वैयक्तिक स्वरोजगारींचे प्रमाण १० टक्यांपेक्षा अधिक असणार नाही), गट केंद्रीत कार्यपध्दती, Forward Backward Linkages, आर्थिक स्थिती, प्रशिक्षण व क्षमता बांधणी, पायाभूत सुविधा व विपणन आणि गरजेप्रमाणे पुरविलेली मदत या बाबींचा समावेश असावा.

iv) बँकांनी प्रकल्प आराखड्यातील युनीट कॉस्टप्रमाणे संयुक्त कर्ज (कॉम्पोझीट लोन) मंजुर करावे आणि कर्जाचे वाटप करीत असताना पारदर्शकता राहील याची विशेष काळजी घ्यावी.

v) कर्जाचे वाटप केल्यानंतर त्यांच्या निर्माण होणाऱ्या मत्तांचीही तपासणी करावी.

**ऊ) पायाभूत सुविधा आणि विपणन :**

१) दिनांक ३१ मार्च, २०१३ अखेर प्रलंबित सर्व दायित्त्वे जिल्हास्तरावरील पायाभूत सुविधा व विपणन या शीर्षांतर्गत उपलब्ध निधीमधून तात्काळ भागविण्यात यावीत. दायित्वाची माहिती महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाकडे तात्काळ सादर करण्यात यावी.

२) सन २०१३-१४ वर्षात नवीन कामे मंजुर करण्यासंदर्भात वेगळ्याने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाकडे प्रस्ताव सादर करावेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या कार्यालयाने राज्यातील मुलभूत सुविधेचा एकत्रित प्रस्ताव शक्तीप्रदान समिती (EC), ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करुन मान्यता घ्यावी.

३) सरस प्रदर्शनांवरील खर्च या अंतर्गत निधीमधून भागविण्यात यावा.

**ए) कौशल्य आणि रोजगार निर्मिती:-**

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबासाठी "एक कुटुंब-एक नोकरी" निर्माण करणारी कौशल्ये विकसित करण्याचे शासनाचे धोरण आहे. यामधून संपूर्ण कुटुंब दारिद्रय रेषेबाहेर आणण्यासाठी हातभार लागु शकेल, या उद्देशाने या योजनेत कौशल्य विकास या घटकावर भर देण्यात आलेला आहे. त्यासाठी बेरोजगार युवक व युवकांमधील विकसित करावयाची कौशल्ये यांचा शोध घेण्यात यावा. जिल्हयातील इंडस्ट्री असोसिएशन आणि चेंबर ऑफ कॉमर्स इतर कौशल्य विकास आणि वेतनी रोजगार उपलब्ध

करुन देणाऱ्या संस्था यांच्याशी विचारविनियम करुन रोजगार निर्मितीच्या संधीचा शोध घेण्यात यावा व त्यानुसार रोजगार निर्मितीचे जिल्हयात लघुप्रकल्प तयार करावेत व जिल्हास्तरीय नियामक समिती व कार्यकारी समिती यांच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करावी.

१) एका प्रकल्पात स्थानिक इच्छुक व लायक दारिद्र रेषेखालील युवकांना वेतनी रोजगारासाठी प्रशिक्षण द्यावे.

२) ज्यांच्याकडे किमान पायाभूत प्रशिक्षण सुविधा आहेत, असे प्रशिक्षक आणि प्रशिक्षकांच्या संस्था (जसे आयटीआय, अभियांत्रिकी महाविद्यालये, नर्सिग महाविद्यालये, केव्हीके, शेतकी महाविद्यालये व पॉलिटेक्नीक महाविद्यालये, नामांकीत शासनमान्य संगणक प्रशिक्षण संस्था) आणि NGOs यांची सक्षम प्राधिकरणाव्दारे निवड करावी.

३) गरजेनुसार प्रशिक्षणासाठी आर-सेटीचा तसेच TRYSEM इमारतीचा सुध्दा उपयोग करण्यात यावा.

४) कौशल्यवृध्दीद्वारे वेतनी रोजगार उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रकल्प प्रस्तावांची छाननी करुन सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी.

५) मोठे उदयोजक ज्यांना १८ ते ३५ वयोगटातील तरुण वर्गाची विशिष्ट कौशल्याच्या कामासाठी आवश्यकता आहे अशा उद्योजकांशी संपर्क करुन त्यांना अशा मुळात कौशल्य असलेल्या तरुण व्यक्तींच्या सरळ मुलाखती घेण्यासाठी निमंत्रित करावे. (जॉब मेळाव्याचे आयोजन करावे)

६) प्रत्येक गाव निहाय दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ३५ वयोगटातील तरुण बेरोजगारांची नोंद वही ठेवून त्यामध्ये त्यांचे नाव, दारिद्र्य रेषा यादीतील क्रमांक, वय, मुळात असलेले कौशल्य किंवा ज्या क्षेत्रात आवड आहे त्या क्षेत्राचे नाव आणि इतर अनुषांगिक माहिती असावी.

७) सरळ निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या मुलाखतीपुर्वी दारिद्रय रेषेखालील तरुणांना ४ ते ५ दिवसांचे व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य आणि इतर मुलाखत पूर्व प्रशिक्षण देऊन त्यांना सरळ वेतनी रोजगारासाठी घेण्यात येणाऱ्या मुलाखतीसाठी पाठवावे.

८) एकूण प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यापैकी किमान ७० % लाभार्थ्यांना वेतनी रोजगार मिळणे आवश्यक राहील.

कौशल्यवृध्दी विषयक प्रस्तावास मंजूरी नंतर अंमलबजावणी यंत्रणेला खालीलप्रमाणे अर्थसहाय्य उपलब्ध करुन दयावे.

| अ.क्र. | तपशील | मोबदला |
|---|---|---|
| १. | प्रस्ताव मंजूरी नंतर कार्यारंभ आदेश दिल्यावर | १० % |
| २. | प्रशिक्षण सुरु करण्यापूर्वी | ३०% |
| ३. | प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर | ३०% |
| ४. | रोजगार उपलब्ध झाल्यानंतर | २०% |
| ५. | संबंधित रोजगारात ३ महिन्यापेक्षा अधिक काळ टिकवणूकीनंतर | १०% |

**<u>ऐ) संनियंत्रण व मुल्यमापन:-</u>**

अभियानाच्या उपयुक्ततेसाठी व यशस्वीतेसाठी सातत्यपुर्वक संनियंत्रण आणि मुल्यमापन अत्यावश्यक आहे. याद्वारे मिळालेल्या अनुभवांच्या आधारे धोरण व अंमलबजावणी कार्यपध्दतीमध्ये सकारात्मक बदल घडवुन अभियानाची फलश्रुती वाढण्यास मदत होईल. स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत सर्व समित्या राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्यरत राहतील. अभियानाचे विभागीय आयुक्त स्तरावर उपायुक्त (विकास) यांच्यामार्फत सनियंत्रण करण्यात येईल. मासिक प्रगती अहवाल दरमहा ३ तारखेपर्यंत ऑनलाईन/ हार्डकॉपीने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यालयास सादर करण्यात यावेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानान जिल्हानिहाय एकत्रित मासिक प्रगती अहवाल एग्राविका कक्ष, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई व केंद्र शासन यांना दरमहा ५ तारखेपर्यंत सादर करावा. अभियानांतर्गत खर्चाचे नियमित अंतर्गत लेखापरिक्षण पथकामार्फत लेखापरिक्षण करण्यात यावे. अभियानाची अंमलबजावणी करताना अंतर्गत लेखापरिक्षण हे वित्तिय अनियमितता टाळण्यासाठी मार्गदर्शक असेल. अंतर्गत लेखापरिक्षणाची जबाबदारी वरीष्ठ लेखाधिकारी / लेखाधिकारी यांच्यावर राहील. उपायुक्त (विकास) यांनी अंतर्गत लेखा परिक्षण प्रत्येक वर्षी होण्यासाठी नियोजन करावे व लेखा परिक्षण अहवाल लेखा अधिकारी, (योजना-२), ग्राम विकास विभाग , मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठवावेत. मासिक प्रगती अहवालाचे नमुने सोबत परिशिष्ट क्र. ६ मध्ये जोडलेले आहेत.

**<u>ओ) प्रशासन:-</u>**

राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ५% रक्कम प्रशासकीय खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या अंतर्गत जिल्हा व तालुकास्तरीय अभियान कक्ष स्थापन व अद्ययावत करणे, जिल्हा अभियान कक्षासाठी लागणारे संगणक, स्टेशनरी, कपाटे-फर्निचरसाठी व गरजेनुसार वाहन व्यवस्था इत्यादी अनुषांगिक बाबींवर खर्च करता येईल. अभियानांतर्गत नवीन वाहन खरेदी करण्यास परवानगी नसल्याने प्रासंगिक कराराने भाडे तत्त्वावर वाहन उपलब्ध करुन घेता येईल. तसेच मुल्यमापन व सनियंत्रण हा अनुषांगिक खर्च या निधीतून भागविता येईल.

उपरोक्त प्रमाणे सर्व शीर्षांतर्गत तरतुदींच्या खर्चाबाबतचे सविस्तर नियोजन करुन त्याचा सन २०१३-१४ च्या वार्षिक कृती आराखडयात समावेश करण्यात यावा व त्याला जिल्हा स्तरीय नियंत्रण समितीची मान्यता घेऊन माहे सप्टेंबर, २०१३ अखेर राज्य अभियान कक्षाकडे सादर करावा. अभियानाच्या फलनिष्पत्तीचा नियमित आढावा कार्यकारी समितीच्या सभेमध्ये घेण्यात यावा. तसेच जिल्हा स्तरावर उपलब्ध निधीपैकी ६०% खर्च झाल्यास पुढील हप्त्याची मागणी उपयोगिता प्रमाणपत्रासह राज्य अभियान कक्षाकडे करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१००११३५८४१४४२० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santokh Singh Sandhu

Digitally signed by Santokh Singh Sandhu
DN: CN = Santokh Singh Sandhu, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Rural Development Department
Reason: I am approving this document
Date: 2013.10.11 16:47:05 +05'30'

**सोबत : परिशिष्ट**

**एस. एस. संधू**

**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव,

५) सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/आदिवासी विकास/महिला व बालकल्याण/सहकार/कृषी व पदुम/उद्योग/उर्जा व कामगार/आरोग्य/शालेय शिक्षण/उच्च व तंत्रशिक्षण/रोजगार व स्वयंरोजगार/ विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) महालेखापाल (लेखापरीक्षा) मुंबई/नागपूर. (५ प्रतीसह)
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर (५प्रतीसह)
८) सर्व विभागीय आयुक्त,
९) सर्व जिल्हाधिकारी,
१०) व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रा (प.) मुंबई.
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद(सर्व),
१२) सर्व उपायुक्त (आस्थापना/विकास) विभागीय आयुक्त कार्यालय,
१३) सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
१४) गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
१५) जनरल मॅनेजर व निमंत्रक, राज्य अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे.
१७) अध्यक्ष, नाबार्ड, बांद्रा (पू), मुंबई.
१८)निवडनस्ती.